## विशेष दिवाणी दावा क्र. १२३/२०२३ मधील नि. ७३ वरील आदेश.

(**CNR–MHAH** २३–०००३७५–२०१८)

१. वादी यांनी अर्जात कथन केले आहे की, त्यांनी दावा मिळकतीचे वाटप होऊन मिळण्यासाठी व अग्रहक्काने खरेदी होऊन मिळण्यासाठी दावा दाखल केला आहे. प्रतिवादी क्र. १ हिने तिच्या नावावरील क्षेत्र प्रतिवादी क्र. ७ ते ९ यांना खरेदी दिले आहे. सदरचा अविभक्त हिस्सा खरेदी देण्याचा कायदेशीर अधिकार प्रतिवादी क्र. १ ला नव्हता. प्रतिवादीकडे दावा मिळकतीचा प्रत्यक्ष ताबा नसल्याने खरेदीदार यांना ताबा मिळालेला नाही. वादीने सदरचा दस्त क्र. २१६६/२०१८ आव्हानित केला आहे. अद्याप खरेदीदारांची नावे ७/१२ उता–यावर दाखल झालेली नाहीत. परंतु सदर नोंद होण्यासाठी मंडळाधिकारी कोळगाव यांचेसमोर सुनावणी सुरू आहे. प्रतिवादींची नावे ७/१२ उता–यावर नोंद झाल्यास मालकी व ताबा याबाबत वाद निर्माण होतील. त्यामुळे दावा मिळकतीबाबत असणारी परिस्थिती दोन्ही बाजूंनी जैसे थे ठेवावी असा आदेश होणे आवश्यक असल्याचे वादी यांचे कथन आहे.

२. प्रतिवादींनी म्हणणे न दिल्याने त्यांचे म्हणणे नाही असा आदेश करण्यात आला.

३. अभिलेखाचे अवलोकन केले. वादीचे सुविदय वकीलांचा युक्तीवाद ऐकला.

४. अभिलेखाचे अवलोकन करता, वादींनी वाटप, जाहीर ठराव व निरंतर मनाई हुकूमासाठी दावा दाखल केला असून प्रतिवादी क्र. ७ ते ९ यांनी दावा मिळकत कोणत्याही प्रकारे त्रयस्थ इसमांना हस्तांतरीत करू नये व वादीच्या दावा मिळकतीतील कब्जेवहिवाटीस हरकत अडथळा करू नये असा तूर्तातूर्त मनाई आदेश मिळण्यासाठी नि. ५ येथे अर्ज दिला आहे. नि. ५ अर्जावर प्रतिवादी क्र. ७ ते ९ यांनी नि. ३० येथे म्हणणे दाखल केले आहे. प्रकरण नि. ५ वर युक्तिवादासाठी प्रलंबित असताना वादी यांनी नि.६७ येथे दावा दुरुस्तीसाठी दिलेला अर्ज मंजूर झाला असून वादी यांनी दुरुस्ती केली आहे. त्यानंतर वादीने दिलेल्या नि. ७२ येथील अर्जावर आदेश होऊन दावा, विशेष दिवाणी दावा या वर्गवारीत पुन्हा नोंदविण्यात आला आहे.

**५.** नि. ७६/१ येथील नोटीस प्रतीचे अवलोकन करता, मंडळ अधिकारी कोळगाव यांनी फेरफार क्र. ८०५ बाबत हरकतीच्या सुनावणीसाठी वादीला नोटीस पाठविली होती असे स्पष्ट होते. वादी यांनी नि. ७८/१ येथे दाखल केलेल्या गट क्र. ८६ च्या ७/१२ उता–याचे अवलोकन करता, सदर दावा मिळकतीस फेरफार क्र. ८०५ नुसार प्रतिवादी क्र. ७ ते ९ यांच्या नावांची नोंद भोगवटदार सदरी झाली असल्याचे निष्पन्न होते. ज्या फेरफाराबाबत व नोंदीबाबत जैसे थे परिस्थती ठेवण्याचा आदेश होण्यासाठी वादी यांनी प्रस्तुत अर्ज दाखल केला आहे तो फेरफार मंजूर होऊन प्रतिवादी क्र. ७ ते ९ यांच्या नावांच्या नोंदी दावा मिळकतीच्या ७/१२ उता–यावर दाखल झाल्या असल्याचे स्पष्ट झाले असल्याने प्रस्तुत अर्जात मागितलेली दाद देवविण्याचे प्रयोजन शिल्लक राहिलेले नाही. सबब, प्रस्तुत अर्ज नामंजूर होण्यास पात्र आहे. करीता, पुढीलप्रमाणे आदेश पारित करण्यात येत आहे.

## आ दे श

१. नि. ७३ येथील अर्ज नामंजूर करण्यात येत आहे.

२. वादी व प्रतिवादी क्र. ७ ते ९ यांनी नि. ५ अर्जावर विनाविलंब युक्तिवाद सादर करावा असा निर्देश देण्यात येत आहे.

GIRISH MADHUKAR SADHALE

Digitally signed by GIRISH MADHUKAR SADHALE
Date: 2023.08.30 11:38:48 +0530

श्रीगोंदा.

दिनांक २९/०८/२०२३.

**( जी. एम. साधले )**

सह दिवाणी न्यायाधीश, व. स्तर,

श्रीगोंदा, जि. अहमदनगर.